व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य

अशासकीय परिरक्षक, तज्ञ, नियमक प्राश्निक, पर्यवेक्षक व परिक्षा नियंत्रक इत्यादिना शासकीय दरानुसार दैनिक भत्ता मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: इएक्सएम ७३८६/२१६४५१[११४१]तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २६ सप्टेंबर, १९८६

पहा:- १]शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक: इएक्सएम ७३८४/३८७५१/[५३५९], तांशि-१, दिनांक २३/१/१९८६.

२]शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: इएक्सएम ७३८६/५३२१६[९०१], तांशि-४, दिनांक ६/३/१९८६

३]संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक: मराव्यशिपमं / ८६/२०१, दिनांक ३१/८/१९८६

शासन निर्णय :-

व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य याजतर्फे घेण्यांत येणा-या विविध प्रमाणपत्र व अन्य व्यवसाय अभ्यासक्रम परिक्षांसाठी नेमण्यांत येणा-या अशासकीय परिक्षक, तज्ञ, नियमक [मॉडरेटर]प्राश्निक, पर्यवेक्षक व परिक्षा नियंत्रक इत्यादिना देण्यांत येणा-या दैनिक भत्यात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता या निर्णयाव्दारे व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाकडून नियुक्त करण्यात येणा-या अशासकीय परिक्षक, तज्ञ, नियमक, प्राश्निक, पर्यवेक्षक व परिक्षा नियंत्रक इत्यादि अधिका-यांना शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: टीआरए १०८३/सीआर १४२६/एसईआर -५, दिनांक १/२/१९८४अन्वये मंजूर करण्यात आलेल्या दैनिक भत्याप्रमाणे सुधारीत दैनिक भत्ता लागू करण्यास मंजूरी देत आहे. यासाठी वर दर्शविलेल्या अशासकीय अधिका-यांना प्रथम श्रेणीचे अधिकारी समजण्यात यावे.

३. सदर आदेश १९८६-८७ या आर्थिक वर्षापासून लागू होतील व यासाठी होणारा खर्च १९८६-८७च्या मंजूर अनुदानांतून भागविण्यात येईल.

..२..

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:सीआर २०४७/८६/ व्यय-५ दिनांक २२/९/८६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ स. मं. आरेकर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद

अध्यक्ष, व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई

महालेखापाल १/२ [लेखा परिक्षा ] महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

महालेखापाल १/२ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

वित्त विभाग [व्यय-५]-सेवा-५]

शिक्षण व सेवायोजन विभाग-अर्थ-२, ताशि-१अ, ताशि-१ब, ताशि-३, तांशि-२ड

निवड नस्ती - तांशि-४

राणे २५९